पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलीस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो. स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पण या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खूप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम यांची माहिती दर्पण या पुस्तकातून अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे.

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी PC8814

---

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो. स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम. डी. [illegible] स.पो. उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करतो की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी त्यांचे संकल्पनेतून साकार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तिकेचे आम्ही नियमित वाचन करीत आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांकडून केलेल्या चांगल्या कामांबाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यास आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही स्टेशन डायरी येथे पोलीस ठाण्याकडील "दर्पण" पुस्तिका ही ठेवून आम्ही पो.स्टे येथे भेटीस आलेल्या अर्जदार व नागरिकांना वाचण्यास देऊन सदर पुस्तिकेमुळे नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

स. पोलीस उप-निरीक्षक
वि. वाडी पो.स्टे पुणे.

# लोकाभिमुख उपक्रम

लोकाभिमुख उपक्रम

### राज्यपाल डॉ. सी. विद्यासागर राव : सेवा व सुरक्षा बोध मानके यांचा लोकार्पण समारंभ

# पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणेकरांना चांगली सेवा देताना अनेक आपल्या कामाने लोकांचे किती समाधान झाले, हे समजावून घेतात. त्याचवेळी परिणामकारक पोलिसिंगविषयी लोकांच्या अपेक्षा स्वतंत्र एजन्सीमार्फत सर्वेक्षण करुन जाणून घेण्याबरोबरच ते प्रसिद्ध करतात, हे पुणे पोलिसांच्या दृष्टीने नक्कीच गौरवास्पद आहे. पुरुषांपेक्षा पुणे पोलिसांवर महिलांचा अधिक विश्वास असल्याचे असे प्रतिपादन राज्यपाल डॉ. सी. विद्यासागर राव यांनी केले.

पुणे पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सुरु केलेल्या सेवा व सुरक्षा बोध मानके यांचे लोकार्पण तसेच सिम्बायोसिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या वतीने पुण्यातील प्रभावी पोलीस प्रशासनाच्या आकलन आणि अपेक्षांबद्दलचे सर्वेक्षण करण्यात आले होते, त्याचे प्रकाशन राज्यपालांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला पालकमंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री संजय भेगडे, सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, खासदार गिरीश बापट, अमर साबळे, जिल्हाधिकारी नवल किशोर राम, पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सह आयुक्त रवींद्र शिसवे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, पाच वर्षापूर्वी पोलीस दलात हस्तक्षेप न करण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला होता. त्यामुळे राज्यात जातीय दंगली झाल्या नाहीत.

अपवाद वगळता गोळी उडाली नाही. सध्या सैनिकाला जी इज्जत मिळते ती पोलिसांना मिळाली पाहिजे, असा आमचा प्रयत्न आहे. पुण्यातील पोलिसांच्या घरदुरुस्तीसाठी २५ कोटी रुपये मंजूर केले असून वाहतूक जनजागृती व पोलिसांच्या मुलांच्या वसतिगृहासाठी ५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली आहे.

प्रारंभी पोलीस आयुक्त व्यंकटेशम यांनी सांगितले की, सर्व देशाला यंदा प्राणघातक अपघातात १० टक्के घट करुन दाखविण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत पुण्यात ३३ टक्के प्राणघातक अपघातात घट झाली आहे.

यावेळी सेवा उपक्रम राबविणाऱ्या पथक व पोलिसांना मदत करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. राज्यपाल सी. विद्यासागर राव म्हणाले, अनेकदा अशा प्रकारचे सर्व्हे हे निवडणुकाच्या काळात केले जातात.

पोलिसांनी आपल्या सेवेविषयी अशा प्रकारे सर्व्हे प्रथमच झाला आहे. येत्या काही दशकात अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येपेक्षा भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या अधिक असणार आहे. त्यांना सेवा देण्याचे आव्हान असेल.



राज्यपाल सी. विद्यासागरराव यांच्या हस्ते सिम्बायोसिस महाविद्यालय येथे पुणे पोलीस दलाने तयार केलेल्या 'सेवा' या कार्यप्रणालीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट कार्याबद्दल पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खासदार गिरीश बापट, पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींच्या सुचनेनुसार सर्व्हे

१ सहआयुक्त रवींद्र शिसवे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील पोलीस महासंचालकांच्या कॉन्फरन्समध्ये पोलिसांनी लोकांना सेवा देताना आपल्या कामाचे स्वतंत्र एजन्सीमार्फत सिक्युरिटी ऑडिट करुन घेण्याची सूचना केली होती. पंतप्रधान यांच्या सूचनेनुसार सिम्बायोसिसने अगदी अमेरिकेच्या सॅपल साईजनुसार सर्व्हे केला आहे.

२ दहशतवादाचे वाढते आव्हान असणार आहे. या सर्व्हेमधील माहिती पाहता पोलिसांविषयी सर्वसाधारण चांगले मत असल्याचे दिसून येते. लोकांना सेवा देतानाच त्याबद्दल १ लाख लोकांचे मत जाणून घेऊन समाधान करणे महत्त्वाचे आहे."

## आता राज्यभरात भरोसा सेल

- बालक, महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरु करण्यात आलेल्या भरोसा सेल आता संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा आदेश राज्याचे पोलीस महासंचालक जयस्वाल यांनी मंगळवारी काढला असल्याचे व्यंकटेशम यांनी सांगितले.

## पुणे पोलिसांच्या वागणुकीत मोठा सकारात्मक बदल

पुणे : सिम्बायोसिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या १८0 प्रशिक्षित विद्यार्थी आणि ७ शिक्षकांच्या गटांनी ७ दिवसांत पुणे पोलीस दलाच्या पाचही परिमंडळातील २ हजार ३३२ सँपलद्वारे मुलाखती घेऊन केलेल्या सर्व्हेमध्ये पुणे पोलिसांच्या वागणुकीत मोठा सकारात्मक बदल दिसून आला आहे. यापूर्वी असा सर्व्हे केवळ नागपूर पोलिसांनी २0१४ मध्ये केला होता. त्याचा आधार या सर्व्हेसाठी घेतला आहे. नागरिकांच्या अपेक्षाबाबत पोलीस ठाण्यात भेटीला गेले असताना प्रश्नांचा भडिमार न करता त्यांच्या तक्रारी शांतपणे ऐकून घेणे, पोलीस चौकशीत त्यांना सुरक्षित व आश्वस्त वाटेल असे वागणे, विनयशील आणि नम्र असणे, चोरी किंवा अपघाताचे ठिकाणी लगेच पोहचणे या अपेक्षा पोलिसांनी ५0 टक्के पूर्ण केल्या आहेत. पोलिसांच्या भूमिकेबद्दल नागरिकांमधील जागरुकता ७७ टक्के, पोलिसांना सहकार्य करण्याची ७0 टक्के नागरिकांनी तयारी दर्शविली. पुणे पोलिसांपर्यंत पोहोचण्याविषयी ६२ टक्के जणांनी सकारात्मक पाठिंबा दिला.

## शहरात ठिकठिकाणी कार्यक्रम : युवकांचा अनोखा उपक्रम

# पोलिसांसह साजरा झाला मैत्रीदिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाजातील प्रत्येक घटकाच्या सुरक्षेसाठी स्वत:ला वाहून घेतलेला घटक म्हणजे पोलीस. समाजाचे स्वास्थ्य टिकवून ठेवण्यात सर्वात मोठा वाटा उचलणारे पोलीस, हे नेहमीच आपल्या मदतीला धावून येतात. त्यांच्या बाबतीत अनेक गैरसमजदेखील तितकेच ठळकपणे दिसून येतात. हेच गैरसमज दूर करण्यासाठी युवा वाद्य पथक व युवास्पंदन प्रतिष्ठानच्या वतीने 'फ्रेंडशिप डे विथ पोलीस' या उपक्रमाचे आयोजन केले होते. यात सुमारे ४० युवक सहभागी झाले होते.

युवा स्पंदनचे प्रवीण चव्हाण म्हणाले, 'पोलीस नेहमीच आपल्याला चांगले कार्य करण्यासाठी प्रवृत्त करत असतात. परंतु, शिस्त लावताना अनेकदा त्यांना कठोर व्हावे लागते. त्यामुळे तरुणाईमध्ये अनेकदा पोलिसांच्या बाबतीत गैरसमज निर्माण होतात. यामुळे पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. हा दृष्टिकोन बदलण्यासाठी त्यांच्याबरोबर मुक्त संवाद होणे आवश्यक आहे. यातील पहिले पाउल म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.'

कार्यक्रमामध्ये विविध महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी विविध पोलीस ठाण्यांना भेट दिली. यामध्ये शिवाजीनगर, चतु:शृंगी व नवी सांगावी येथील पोलीस अधिकाऱ्यांसोबत संवाद साधण्यात आला. त्यामुळे तरुणाईलादेखील पोलिसांचा दृष्टिकोन समजण्यास मदत झाली. या उपक्रमात चतु:शृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक झेंडे आणि सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी भुजबळ उपस्थित होते.

### संस्थांनी पुढाकार घ्यावा

- चतु:शृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव म्हणाले, 'उपक्रम सातत्याने घेण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.
- पोलीस नेहमीच प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असून त्यांना मदत करण्यासाठी आजच्या तरुणाईने पुढाकार घेणे गरजेचे आहे.
- आपल्या सभोवती घडणाऱ्या बेकायदेशीर घटनांची माहिती तरुणाईने दिल्यास समाजाचे स्वास्थ्य राखण्यास निश्चितच हातभार लागेल.'

# एक शाम, दोस्ती के नाम!

- पुणे : मैत्री हे मानवी मूल्यांमधील एक महत्त्वाचे मूल्य आहे. मैत्रीशिवाय समाजामध्ये एकता येऊ शकत नाही. कोणतीही लोकशाही वृद्धिंगत होण्यासाठी लोकांमध्ये सामंजस्य असणे आवश्यक असते. ते मैत्रीपूर्ण संबंधातूनच निर्माण होऊ शकते. त्यामुळे मैत्री दिवस साजरा करणे खूप महत्त्वाचे आहे.



- जात, धर्म, लिंग, प्रांत, वर्ग यांच्या पल्याड जाऊन मैत्री अनुभवण्यासाठी लोकायत 'मैत्री दिवस' दरवर्षी वेगळ्या पद्धतीने साजरा करते. या वर्षीही 'एक शाम दोस्ती के नाम' असाच दिलखुलास कट्टा 'काफिला'मार्फत आयोजित करण्यात आला. लोकायतची सांस्कृतिक आघाडी असलेल्या 'काफिला'द्वारे 'एक शाम दोस्ती के नाम' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन येथे करण्यात आले होते. या वेळेस आपल्या मैत्रीचे अनोखे अनुभव सांगत सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.
- या कार्यक्रमात लोकांनी मैत्रीची विविध गाणी, कविता, लघुनाटय, नृत्य अशा वेगवेगळ्या कला साद[illegible] केल्या. 'रॅप' नृत्याद्वारे शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. या वेळेस सहकार्याची भावना वाढीस लावणारे काही खेळही खेळण्यात आले. यांद्वारे देशातील अराजक परिस्थिती, धार्मिक-जातीय तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्ती, स्त्री-पुरुष समानता, शेतकरी आत्महत्या, संवैधानिक मूल्ये अशा विविध विषयांवर सादरीकरण करण्यात आले. पुण्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाला प्रतिसाद दिला.

लोकमत – दि. ०५ ऑगस्ट, २०१९

संडे अँकर । पुणे पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक । ७३ जणांना मुद्देमाल परत

# चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले हसू

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : शनिवारी पोलीस आयुक्तालयाच्या सभागृहात उपस्थित राहिलेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून येत होते. वर्षभरापूर्वी चोरीला गेलेले मंगळसूत्र असो, मोबाईल, किंवा आयुष्यभराची पुंजी म्हणून साठवलेले पैसे असोत ते पुन्हा मिळाल्यानंतर त्यांनी पोलीस प्रशासनाबद्दल कृतार्थतेची भावना व्यक्त केली. कुठली का होईना वस्तू चोरीला गेल्यास ती पुन्हा मिळणे अवघड अशी धारणा होऊन बसलेल्या त्या नागरिकांना पोलिसांनी त्यांचा चोरीचा मुद्देमाल परत करून मोठा दिलासा दिला.

चोरी झालेल्या मुद्देमालाचे पुणे पोलीस आयुक्तालयाकडून वितरण करण्यात आले. यात सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल व वाहने अशा चोरी झालेला ७३ गुन्ह्यांतील फिर्यादींना परत करण्यात आला. या कार्यक्रमाला अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपआयुक्त बच्चन सिंह उपस्थित होते. याप्रसंगी अनेक नागरिकांनी मनोगत व्यक्त करुन पोलीस प्रशासनाचे आभार मानले. शामसुंदर निभोरकर यांनी पोलिसांकडून मिळत असलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, माझ्या पत्नीचे मंगळसूत्र चोरीला गेले होते. पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर बऱ्याच जणांनी मला ते मंगळसूत्र पुन्हा मिळणे कठीण असल्याचे सांगितले. मात्र पोलिसांनी त्या सगळ्यांचे म्हणणे खोटे ठरवत ते मंगळसूत्र मिळवून दिले. पोलिसांकडून पुरेसे सहकार्य मिळत नाही अशी ओरड केली जाते. परंतु ते खरे नाही. नागरिकांनी त्यांना सहकार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

आयटी इंजिनिअर म्हणून काम करणाऱ्या सोपान कदम या तरुणाने आपला चोरीला गेलेला मोबाईल पुन्हा मिळणे अशक्य म्हणून त्याची वाट पाहणे सोडून दिले होते. एका वर्षानंतर त्याला मोबाईल मिळाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. याबद्दल त्याने पोलिसांचे आभार मानले.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक

१ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे मोराळे यांनी कौतुक केले. ते म्हणाले, मुद्देमाल वितरणाचा कार्यक्रम भावनिक पद्धतीने होऊ शकतो. हे श्रेय पोलिसांच्या कामगिरीचे आहे. यापुढील काळात नागरिकांनी आपल्या सोसायट्यांमध्ये सीसीटीव्ही लावावेत.

२ याबरोबरच दुकानदारांनीदेखील सीसीटीव्हीचे महत्त्व ओळखावे. यामुळे तपास करताना पुरावा म्हणून सीसीटीव्हीची मोठी मदत होते. लोकसहभागातून शहरात सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरु असून, आतापर्यंत २८ हजार सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. सूत्रसंचालन सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी केले. पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी आभार मानले.

### उपनगरामध्ये स्थानिक पोलिसांनी मंडळांना जाहीर केली मार्गदर्शक तत्त्वे

# पोलिसांनी घेतली उपनगरातील गणेश मंडळांची शाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नऱ्हे :** दहीहंडी मंडळ तसेच गणेश उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांनी कायद्याचे पालन करावे, इतरांना त्रास होणार नाही, तसेच लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून परवाना काढावेत, असे आवाहन पोलीस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड यांनी धायरी येथे केले.

सिंहगड रोड पोलीस स्टेशन अंतर्गत, सर्व सार्वजनिक दहीहंडी मंडळ तसेच गणेशोत्सव साजरा करणाऱ्या सर्व मंडळांची बैठक धायरी येथील मुक्ताई गार्डन येथे आयोजित केली होती. या वेळी बैठकीत सहायक पोलीस आयुक्त पी. राठोड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दुर्योधन पवार, पोलीस निरीक्षक दादा गायकवाड, अग्निशमन दलाचे प्रभाकर उमरटकर, महावितरणचे दीपक बावर, वाहतूक विभागाचे भोसले, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सचिन निवंगुणे, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, नगरसेविका मंजूषा नागपुरे, संदिप चव्हाण, शिवाभाऊ पासलकर, मिलिंद पोकळे, किशोर पोकळे, समीर रुपदे, भावना थोरात व इतर मंडळ अध्यक्ष व




धायरी येथील मुक्ताई गार्डनमध्ये झालेल्या कार्यक्रमात दहीहंडी मंडळ तसेच गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- उत्सवानिमित्त या काळात कोणती दक्षता घ्यावी, विसर्जन मिरवणूक एका मार्गाने नंबरप्रमाणे कशी काढावी, वाहतूक नियोजन कसे करावे, इतरांना अडथळा न करता मंडप कसा घालावा, कोणतीही घटना घडू नये याकरिता कोणकोणते साहित्य मंडपात असावे, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे, अध्यक्ष पदाधिकारी यांची माहिती तसेच साउंड सेवा, लाईट व्यवस्था, मंडप व्यावसायिक, ट्रक ट्रॅक्टरचे ड्रायव्हर, वॉचमन अशा लोकांचीसुद्धा माहिती पोलीस स्टेशनला कळवावी, अशा सूचनाही या वेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या वेळी अनंत चतुर्थीच्या आदल्या दिवशी उशिरापर्यंत परवानगी मिळावी, अशी मागणी मंडळाच्या वतीने करण्यात आली. वाहतूक, मनपा, आरोग्य, मंडप, विद्युत, पोलीस, अग्निशमन आदी सर्व विभागांतील अधिकाऱ्यांनी एकाच वेळी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

## उत्सव मंडळांनी शिस्तीचे पालन करावे

- कर्वेनगर : दहीहंडी आणि गणेशोत्सव मंडळांनी कायद्याचे आणि शिस्तप्रिय नियमांचे पालन करून नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही अशा पद्धतीने उत्सव साजरा करावा, असे आवाहन झोन तीनच्या नवनिर्वाचित उपायुक्त पौर्णिमा गायकवाड यांनी उत्सव मंडळांना केले आहे. वारजे पोलीस स्टेशनअंतर्गत उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाची बैठक वारजेमधील तपोधाम सोसायटीमधील जिजाई गार्डन या ठिकाणी उत्साहात पार पडली. या वेळी नियम मोडणाऱ्या आणि गैरवर्तन करणाऱ्या मंडळांवर कडक कारवाई करत परवाने रद्द करणार असल्याचे एसीपी मच्छिंद्र चव्हाण यांनी सांगितले.
- आम्ही नियमांची अंमलबजावणी करत उत्सव साजरा करणार असल्याचे युनिव्हर्सल मित्र मंडळाचे अध्यक्ष धनंजय आयतोळे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस शांतता कमिटी अध्यक्ष ॲड. राहुल पाटील यांनी केले.

## भारती पोलीस आणि न्यायालयाचे निर्देश

धनकवडी : उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आवाजाची पातळी पाळणे ही प्रत्येक मंडळाची नैतिक जबाबदारी आहे. पोलीस प्रशासन आणि नागरिकांनी एकमेकांना सोबत घेऊन मिळून मिसळून गणेशोत्सव साजरा करु यात, असे आवाहन स्वारगेट विभागाचे सहायक पोलिस आयुक्त मालोजीराव पाटील यांनी केले. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या गणेश मंडळ कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना पाटील बोलत होते.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ताम्हाणे यांनी गणेश मंडळांना अटी व नियमांबाबत माहिती दिली. दरम्यान, कार्यकर्त्यांनी केलेल्या तक्रारी आणि सूचनांची योग्य दखल घेऊन निरसन करण्यात येईल, अशी हमी ताम्हाणे यांनी दिली.

तसेच, मागील वर्षी गणेश विसर्जन मिरवणुकीत पोलिसांना बंदोबस्त कामात सहकार्य करणाऱ्या एकता योगा ट्रस्ट, अभिनव एज्युकेशन सोसायटीचे एन.एस.एस.चे विद्यार्थी व सिद्धिविनायक ग्रुप कात्रज यांचा गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी शांतता कमिटीच्या सदस्यांबरोबरच १५० कार्यकर्ते उपस्थित होते.

## पुणे शहर पोलीस : निधीसाठी महापालिकेकडे लेखी मागणी

# नगरसेवकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संपूर्ण शहरभर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. परंतु पुणे शहर पोलिसांकडे यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध नाही. यामुळे महापालिकेच्या वतीने प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून २ लाख असे सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा निधी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी खर्च करण्यात येणार आहे. शहर पोलिसांनी महापालिकेला निधीची मागणी करणारे लेखी पत्र दिले आहे.

गेल्या काही वर्षांत पुणे शहर पोलिसांमार्फत शहरातील बहुतेक सर्व प्रमुख चौक आणि प्रमुख रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परंतु अद्यापही शहरातील फार मोठा भाग सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरेखाली आलेला नाही. यामुळेच सुरक्षितेच्या दृष्टीने संपूर्ण शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची गरज असून, महापालिकेने यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी पोलिसांनी केली आहे. पोलिसांच्या या मागणीनुसार महापालिका प्रशासनाने सर्व नगरसेवकांना विनंती केली असून, प्रत्येक नगरसेवकाने आपल्या वॉर्डामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी किमान प्रत्येकी २ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा.

### किती कॅमेरे लागणार, याची माहिती घेण्याचे काम सुरु



याबाबत महापालिकेच्या विद्युत विभागाचे मुख्य अभियंता श्रीनिवास कंदुल यांनी सांगितले की, महापालिकेच्या वतीने गणेशोत्सवामध्ये सर्व घाट परिसरामध्ये तात्पुरत्या स्वरुपामध्ये कॅमेरे बसविले जातात. परंतु संपूर्ण शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नेटवर्क उभे करण्याची गरज आहे. यासाठी प्रत्येक नगरसेवकाकडून २ लाख रुपयांचा निधी घेण्यात येणार आहे. यासाठी पोलिसांकडून कोणत्या परिसरामध्ये किती कॅमेरे बसविण्याची गरज आहे, याबाबत माहिती घेण्यात येणार आहे. त्यानंतर सीसीटीव्ही बसविण्याचे नियोजन करण्यात येईल, असे कंदुल यांनी स्पष्ट केले.

लोकमत – दि. २३ ऑगस्ट, २०१९

पुणे पोलिसांचे आवाहन : गोविंदांनी स्वयंशिस्तीचे पालन करुन आनंदाने उत्सव साजरा करावा...

# उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच...

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : बाळगोपाळांकरिता आनंदाची पर्वणी असणाऱ्या दहीहंडीच्या उत्सव शहरभर उत्साहात साजरा केला जातो. मात्र उत्साहात उत्सव साजरा करत असताना त्याला बेशिस्तपणाचे गालबोट लागणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन पुणे पोलीस प्रशासनाने शहरातील सर्व दहीहंडी मंडळांना केले आहे. तसेच गोविंदांनीदेखील दहीहंडी सोहळ्याचा आनंद लुटताना कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. असेही प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. या वर्षी ९८३ मंडळे सहभागी होणार असून, याबाबतची अधिकृत नोंदणी पुणे शहर पोलिसांकडे करण्यात आली आहे. यात ७३ मोठ्या आणि ९१० लहान मंडळांचा समावेश आहे.

दहीहंडी उत्साहात साजरा करण्यासाठी शहरातील मध्यवर्ती भागात पेठांमध्ये नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहावयास मिळते. त्या पार्श्वभूमीवर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. बंदोबस्तासाठी स्थानिक पोलिसांसह पोलीस आयुक्तालयातील अधिकारी कर्मचारी तसेच स्ट्रायकिंग पथके नेमण्यात येणार आहेत. दरम्यान, नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच काही चुकीची माहिती समजल्यास पोलीस नियंत्रण कक्षास संपर्क साधून खातरजमा करावी. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे २० मंडळांनी संख्या कमी झाली आहे. गतवर्षी ध्वनिप्रदूषण प्रकरणी ४ मंडळांवर गुन्हे दाखल करून तिघांविरोधात खटले दाखल करण्यात आले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### उपनगरांमध्ये देखील दहीहंडीची मोठी क्रेझ

- मागील काही वर्षांपासून केवळ शहरातच नव्हे तर उपनगरांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात दहीहंडीचा उत्सव साजरा होत आहे. नागरिकांना दहीहंडीत सहभागी करुन घेण्याकरिता सेलिब्रेटींना आयोजित करण्यावर मोठा खर्च करण्याकडे मंडळाचा कल दिसून येतो.
- शहरातील दहीहंडी उत्सव पाहण्यासाठी मध्यवस्तीत मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. रात्री बारा वाजेपर्यंत हा उत्सव साजरा केला जातो. ठिकठिकाणी लाखो रुपयांचे बक्षीस यासाठी ठेवण्यात आलेले असते.
- नागरिकांसोबतच लहान मुले देखील हा उत्सव पाहण्यासाठी येत असतात. पुण्याबाहेरुन खास लोक दहीहंडीसाठी येण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. कारण इथल्या उत्सवाचा रंगच निराळा असतो.



### तीन वर्षांत घडलेले अपघात

गेल्या तीन वर्षांमध्ये शहरातील दहीहंडी उत्सवात अपघात झाल्याची नोंद नाही. त्यामुळे जखमी किंवा मृत्यू झालेले नाहीत.

" दहीहंडीचा उत्सव उत्साहात साजरा करण्याकरिता सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. माननीय न्यायालयाने केलेल्या सूचनांचे पालन करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाने उत्सवात दहीहंडी मंडळांना सूचनापत्रे देऊन मार्गदर्शन करण्यात आले आहे. ध्वनिक्षेपकाबद्दल नियम पाळणे गरजेचे आहे.

- डॉ. रवींद्र शिसवे,
सहायक पोलीस आयुक्त पुणे.

" दहीहंडीचे मंडळाचे यंदा १४ वे वर्ष असून या वेळी महिलांच्या आरोग्याविषयक समस्यांवर उपचार केंद्राचे आयोजन दहीहंडीच्या निमित्ताने केले जाणार आहे. स्तनाचा आणि गर्भाशयाचा कर्करोगसंबंधी महिलांची तपासणी करण्यावर भर दिला जाणार आहे.

- अजय बोरस्ते,
संस्थापक उर्ज युवा प्रतिष्ठान.

### अशी आहे नियमावली

- गोविंदा पथकात १४ वर्षांखालील मुलगा/मुलगी यांना भाग घेण्यास मनाई
- आयोजकांनी गोविंदा पथकास हेल्मेट, सेफ्टी बेल्ट तसेच दहीहंडी कार्यक्रमाच्या ठिकाणी कुशन लेअर पुरवावेत.
- दहीहंडीसाठी पोलिसांची पूर्व परवानगी आवश्यक
- गोविंदा पथकात दारूचे सेवन केलेल्यास घेऊ नये
- पथकातील सभासदाचा विमा हवा
- कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रथमोपचार औषधे व सुसज्ज रुग्णवाहिका ठेवावी.

लोकमत – दि. २३ ऑगस्ट, २०१९

# एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार

## पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन मिरवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी पोलीस प्रशासनाने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता उपाययोजना तयार केल्या आहेत. यात एका ढोल ताशा पथकाला फक्त एकाच गणेश मंडळासोबत विसर्जन मिरवणुकीत सहभागी होता येईल. तर सहभागी झालेल्या गणेश मंडळाचे विसर्जन झाल्यानंतर त्या मंडळासोबत असलेल्या ढोल ताशा पथकाला पुन्हा नव्याने दुसऱ्या गणेश मंडळात सहभागी होता येणार नाही. अशा सूचना पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी ढोल ताशा पथक, पथकाचे प्रमुख, गणेश मंडळाचे पदाधिकारी आणि सदस्यांना दिल्या आहेत.

### स्वतंत्र परवानगी घेणे बंधनकारक

- ढोल ताशा पथक मिरवणूक वेळेपूर्वी पोहोचले नाही या कारणावरुन कोणत्याही गणेश मंडळांना मिरवणूक थांबविता येणार नाही. प्रत्येक ढोल ताशा पथकाने गणेश प्रतिष्ठापना/विसर्जन मिरवणुकीकरिता गणेश मंडळासोबत सहभागी होण्याची व वादन करण्याची स्वतंत्र परवानगी घेणे बंधनकारक आहे.
- विनापरवानगी कोणत्याही ढोल ताशा पथकास विसर्जन मिरवणुकीत ऐनवेळी सहभागी होता येणार नाही. ढोल ताशाचे वादन करता येणार नसल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



येत्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने मिरवणुकीत एका मंडळासमोर किती ढोल ताशा पथके लावावीत वा एका ढोल ताशा पथकामध्ये किती वाद्ये व सदस्य याकरिता नियमावली केली आहे. यात एका ढोल ताशा पथकामध्ये कमाल ४० ढोल, १० ताशे, ६ झांज एवढ्याच वाद्यांचा समावेश असावा. त्यापेक्षा अधिक वाद्यांचा वापर करण्यात येऊ नये. एका ढोल ताशा पथकामध्ये वादक व त्या सभोवतालचे सुरक्षा कडे करणाऱ्या व्यक्ती अशा मिळून जास्तीत जास्त १०० सदस्यांचा समावेश असावा. त्यापेक्षा अधिक सदस्यांचा एका ढोल ताशा पथकामध्ये समावेश नसावा.

ढोल ताशा पथकाने टोल वापरु नये. प्रतिष्ठापना व विसर्जन मिरवणुकीमध्ये मानाच्या गणेश मंडळासोबत जास्तीत जास्त ३ ढोल ताशा पथके व इतर गणेश मंडळांसोबत जास्तीत जास्त २ ढोल ताशा पथके वापरता येतील. यापेक्षा जास्त ढोल ताशा पथके वापरता येणार नसल्याचे नियमावलीत स्पष्ट केले आहे.

लोकमत – दि. २३ ऑगस्ट, २०१९

# गणेशोत्सव मिरवणुकी दरम्यान 'नो डॉल्बी'

## पोलीस सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या डीजेमालकांना सूचना : नियमावली जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेशोत्सवात कानठळ्या बसविणाऱ्या डॉल्बी डीजेचा वापर मंडळांना करता येणार नाही. उच्च न्यायालयाकडून देण्यात आलेल्या सूचना आणि ध्वनिप्रदूषण अधिनियमानुसार मंडळांना डॉल्बीविषयी निर्देशित करण्यात आले आहे. पुणे शहराचे पोलीस सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी गणेश मंडळाचे अधिकारी, कार्यकर्ते, साऊंड सिस्टीम चालक व मालक यांना डॉल्बी डीजेचा उपयोग मिरवणुकी दरम्यान करता येणार नसल्याच्या सूचना दिल्या आहेत.

गुरुवारी पुणे पोलिसांकडून गणेशोत्सवासंबंधी नियमावली जाहीर करण्यात आली. गणेश प्रतिष्ठापना व गणेश विसर्जन मिरवणूक यात मंडळांकडून साऊंड सिस्टीम लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी मंडळे, मंडळांचे पदाधिकारी न्यायालयाने निर्देशित केल्यानुसार नियमांचे पालन करत नसल्याचे दिसून आले आहे.

अनेकदा साऊंड सिस्टीम लावण्यावरून मंडळे, पदाधिकारी, राजकीय नेते आणि पोलीस प्रशासन यांच्यात वाद झाले आहेत. उत्सवादरम्यान कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, याकरिता प्रशासनाकडून काळजी घेण्यात येणार असून, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नियमांचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मंडळांच्या वतीने वाजविण्यात येणाऱ्या साऊंड सिस्टीममधील स्पीकरच्या आवाजाची मर्यादा उच्च न्यायालयाने निर्देशित केल्यानुसार ठेवण्यात यावी. प्रत्येक मंडळाने म्युझिक सिस्टीम (स्पीकर) / साऊंड सिस्टीमकरिता पोलीस स्टेशनकडून त्याबाबतचा स्वतंत्र परवान घेणे आवश्यक आहे. मिरवणुकीमध्ये कुठल्याही मंडळाला डीजे किंवा डॉल्बीचा वापर करता येणार नाही.



### ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा खालीलप्रमाणे (डेसिबल)

| विभाग | दिवसा | रात्री |
|---|---|---|
| औद्योगिक | ७५ | ७० |
| कॉमर्स झोन | ६५ | ५५ |
| राहण्याची जागा | ५५ | ४५ |
| शांतता विभाग | ५० | ४० |

### ओळखपत्र बंधनकारक

- मंडळांमध्ये मिरवणूक व इतरवेळी वाजविण्यात येणारे म्युझिक सिस्टीम / साऊंड सिस्टीममधील मिक्सर संचलन करणाऱ्या व्यक्तीने स्थानिक पोलीस स्टेशनला आपली संपूर्ण माहिती देऊन, प्रशासनाकडून ओळखपत्र घेणे बंधनकारक असणार आहे.
- २ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजल्यापासून ते १३ सप्टेंबर पर्यंत रात्री दहापर्यंत हे नियम पाळणे बंधनकारक असणार आहे.

लोकमत – दि. २० ऑगस्ट, २०१९

## उत्कृष्ठ देखावे : हडपसर पोलीस व पत्रकार संघाच्यावतीने मंडळाना पुरस्कार

# सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**हडपसर :** हडपसर पोलीस स्टेशन व हडपसर पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे हडपसर परिसरातील गणेशोत्सवात केलेले आकर्षक देखावे व आकर्षक मिरवणुकीस सुखकर्ता पुरस्काराचे वितरण करण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

सहायक पोलीस आयुक्त अशोक कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, अनिल मोरे, दिगंबर माने, गुन्हेचे पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, नगरसेवक मारुती तुपे, योगेश ससाणे, माजी उपमहापौर नीलेश मगर, माजी नगरसेवक सुनील बनकर आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते



पुरस्कार स्वीकारताना मंडळाचे कार्यकर्ते.

गणेशोत्सव व विविध सण पार पाडण्यासाठी उच्च न्यायालयाने व शासनाने नियमावली करुन दिली आहे. नियमात राहून गणेश मंडळाने उत्सव साजरे केले तर शांततेचा भंग होत नाही व समाजामध्ये समतोल बिघडत नाही, कार्यकर्त्यांनी अतिउत्साह न दाखवता नियमांचे काटेकोर पालन करावे व पोलीस पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांनी केले.

यावेळी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी गणेशोत्सवामध्ये येणाऱ्या अडचणी मांडल्या व उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांनी शंकांचे समाधान केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मीनल गुरव यांनी केले तर दिगंबर माने यांनी आभार मानले.

गणेशोत्सव परिक्षण मंडळाचे सदस्य जयप्रकाश वाघमारे, कृष्णकांत कोबल, रवींद्र चव्हाण, शोभा कुंजीर, हनुमंत यादव आदींनी परीक्षण केले. दीपक वाघमारे व डॉ. शंतनू जगदाळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

- ◆ उत्कृष्ट देखावा पुरस्कार विजेत्यांमध्ये कामधेनू मित्र मंडळ, नवमहाराष्ट्र तरुण मंडळ, श्रीकृष्ण मित्र मंडळ, कानिफनाथ मित्र मंडळ, नवयुग मित्र मंडळ, अजंठा मित्र मंडळ, श्रीगणेश मित्र मंडळ, अखिल महादेवनगर युवा मंच आदींना वितरित करण्यात आले.
- ◆ विसर्जन मिरवणूक पुरस्कार विठ्ठलनगर तरुण मंडळ, श्रमिक मित्र मंडळ, श्री गणेश फेस्टिव्हल, शशी नवयुवक तरुण मंडळ यांना देण्यात आले. रशीद शेख, दशरथ जाधव व स्वप्निल धर्मे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# पोलिस ठाण्यांत आता ‘सीपीओ’

## पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून करणार काम; आयुक्तांचा उपक्रम

Kuldeep.Jadhav
@timesgroup.com
Tweet : @KuldeepJadhavMT

पुणे : समाजमनातील पोलिसांबाबतची प्रतिमा उंचावण्यासाठी आणि पोलिस व नागरिकांमध्ये एक आपुलकीचे नाते तयार करण्यासाठी पोलिसांकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी कम्युनिटी पोलिसिंग ऑफिसरची (सीपीओ) नेमणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या 'सीपीओं'ना हद्दीचे बंधन नसल्याने ते खऱ्या अर्थाने पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून काम करणार आहेत. गेल्या महिनाभरापासून हे 'सीपीओ' शहरातील सर्व पोलिस ठाण्यांत कार्यरत आहेत.

> गुन्हे नियंत्रण आणि संरक्षकाची भावना निर्माण करण्यासाठी सर्व सीपीओ काम करतील. या कामी स्वतंत्र कर्मचारी नेमले आहेत. पुण्यात प्रथमच हा उपक्रम राबविला जात आहे. नागरिकांना चांगली सेवा मिळावी, हा यामागील मुख्य उद्देश आहे.
>
> – डॉ. के. व्यंकटेशम, पोलिस आयुक्त, पुणे

> नागरिक मोठ्या अपेक्षेने पोलिसांकडे येतात आणि त्यांना मदत मिळण्याची खात्री देखील असते. अनेक जण आमच्या पाठिवर शाब्बासकीची थापही मारतात. त्यामुळे 'सीपीओ' म्हणून काम करताना एक प्रकारचे समाधान मिळत आहे.
>
> – श्रीकांत शिरोळे, हवालदार व सीपीओ, दत्तवाडी पोलिस ठाणे

### उपक्रमातील ठळक मुद्दे

- किरकोळ तक्रारींचीही घेणार दखल
- 'सीपीओं'ना हद्दीचे नाही बंधन
- व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे सर्व 'सीपीओ' संपर्कात
- दर शनिवारी विशेष शाखेला कामाचा अहवाल पाठविणार
- परिसरातील पोलिस कामांची मिटिंग घेणे बंधनकारक



**मटा विशेष**

पोलिस दलाची प्रतिमा सुधारण्यासाठी गेल्या काही महिन्यात पोलिस आयुक्तालयाकडून प्रयत्न सुरू आहेत. त्याअंतर्गत कायद्याच्या चौकटीत राहून आणि वेळप्रसंगी चौकटीबाहेरील विषयवेळील सामोपचाराने मिटवून संबंधितांना दिलासा दिल्याचे अनेक प्रकार घडले आहेत. याच प्रकाराला मूर्त रूप देण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या सूचनेनुसार प्रत्येक पोलिस ठाण्याच्या स्तरावर एक 'सीपीओ' नेमण्यात आला आहे. शहरातील ३० पोलिस ठाण्यात प्रत्येकी एक 'सीपीओ' कार्यरत आहे. वरिष्ठ निरीक्षकांचे लेखनिक (रायटर) 'सीपीओ' म्हणून काम पाहणार आहेत. साधारणपणे 'रायटर' हे पोलिस दलातील अनुभवी कर्मचारी असतात. एखादी संवेदनशील घटना, कुटुंबातील समस्या, मुलामुलींचे प्रेमसंबंध, सासू-सुनांची भांडणे, ज्येष्ठ नागरिकांची हेळसांड, हरवलेली लहान मुले-वृद्ध यांचा शोध घेणे हे विषय घेऊन अनेक जण वरिष्ठ निरीक्षकांकडे येतात. हे विषय 'सीपीओ' हाताळणार आहेत.

सामान्यपणे पोलिस ठाण्यात एखाद्या विषयाची तक्रार नोंदवून घेतली जाते आणि त्याचा तपास सुरू आहे, अशी उत्तरे नागरिकांना मिळत असल्याचा नागरिकांचा अनुभव आहे. हे चित्र बदलण्याचा प्रयत्न याद्वारे केला जाणार आहे. 'सीपीओ'कडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीचे निवारण प्राधान्याने केले जाणार आहे. 'सीपीओ' पोलिस ठाण्यात कनिष्ठ कर्मचाऱ्यांना सांगून तो विषय मार्गी लावतात. यामध्ये चौकटीबाहेर जाऊनही काम केले जाते. दरम्यान, सर्व 'सीपीओं'ची एक बैठक झाली असून, या बैठकीत सर्वांना अपेक्षित कामाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. १८ ऑगस्ट, २०१९

# महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक

पुणे : हैदराबाद येथे महिला सुरक्षेसाठी स्थापन केलेले 'सिक्युरिटी ऑफ हर इनशुर्ड' (SHE-शी) पथक यशस्वी ठरल्यानंतर आता पुणे पोलिस आयुक्तालयातील प्रत्येक पोलिस ठाण्यांत असेच पथक तयार करण्यात आले आहे. त्या पथकाला 'दामिनी टू' असे नाव देण्यात आले आहे. साध्या वेशात फिरून छेडछाडीची ठिकाणे निश्चित करणे, फोन, सोशल मीडियाच्या माध्यमातून त्रास देणाऱ्यांवर कारवाई करणे, पीडित महिलांना मदत अशी कामे या पथकाद्वारे करण्यात येत आहेत.

महिलांवर होणारे अत्याचार, प्रत्यक्ष व सायबर माध्यमामार्फत होणारे छेडछाडीचे प्रकार रोखण्यासाठी आणि महिलांना समाजात ताठ मानेने जगता यावे म्हणून हैदराबादचे पोलिस आयुक्त महेंदर रेड्डी यांनी २०१४ मध्ये शी (SHE) पथकाची स्थापना केली होती. या पथकाने हैदराबाद पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत महिलांसाठी खूपच चांगले काम केले. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांत महिलांच्या सुरक्षेसाठी काम करणारे अशा प्रकारचे पथक असावे, अशी संकल्पना पुढे आली. त्यानुसार राज्याच्या गृह विभागाने पुणे पोलिसांना असे पथक तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

### सोशल मीडियावरून त्रास देणाऱ्यांवरही राहणार लक्ष

**पथकाचा राहणार सर्वत्र वॉच**

शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्यांचा एक अधिकारी व दोन ते तीन कर्मचारी या पथकामध्ये कार्यरत आहेत. या पथकावर सहायक पोलिस आयुक्तांची देखरेख असणार आहे. महाविद्यालयीन तरुणींची छेड, विविध ठिकाणी महिलांवर होणारे अत्याचार यांसह इतर छेडछाडीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पथक काम करेल. तसेच, शाळा, महाविद्यालये, खासगी क्लासेस, आयटी कंपन्यांच्या ठिकाणी जाऊन पथक गस्त घालत आहे. तसेच विद्यार्थी आणि महिलांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या जात आहेत.

**पथकाचे काम काय?**

- महिलांचा लैंगिक छळ रोखणे
- फोन, मेसेज, सोशल मीडियाद्वारे त्रास देणाऱ्यांवर कारवाई करणे
- महिलांना वेळेत मदत देणे
- गंभीर गुन्ह्यांच्या प्रसंगी प्रतिबंधात्मक पथक म्हणून काम करणे
- दिशाभूल झालेल्या तरुणांना सुधारणे, जागरूक करणे

"सिक्युरिटी ऑफ हर इनशुर्ड (एसएचई) पथक सुरू केले असून, पथकाला दामिनी टू असे नाव दिले आहे. पथकामधील पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले आहे.

– बच्चन सिंग, पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा

**प्रभात** – दि. २५ ऑगस्ट, २०१९

# पुणे पोलिसांचा राष्ट्रीय गौरव

## स्मार्ट पोलिसिंगसाठी दोन पुरस्कारांनी सन्मान

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. २४ - स्मार्ट पोलिसिंगसाठी पुणे शहर पोलिसांना राष्ट्रीय स्तरावरील दोन पारितोषिकांनी दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले. फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर कॉमर्स इन्डस्ट्रीज (फिक्की) संस्थेने सन २०१९ वर्षाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांच्या हस्ते नुकतेच हे पुरस्कार स्वीकारले.

या संस्थेच्या वतीने 'अंतर्गत सुरक्षा' विषयावर दरवर्षी या परिषदेचे आयोजन करण्यात येते. ज्यामध्ये केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी, केंद्रीय सशस्त्र दले तसेच विविध राज्य पोलीस दलांची उपस्थिती असते. नागरिकांची सुरक्षा वाढविण्यासाठी पोलिसांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये विविध सुरक्षा दलाचे सुमारे १९५ घटक सहभागी झाले होते. 'फिक्की' आणि विवेकानंद इंटरनॅशनल फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यात क्रिमिनल इंटेसिव्ह रिस्पॉन्स प्रोजेक्ट (क्रीस्प) आणि प्रोॲक्टिव्ह कंट्रोल ऑन वुमन ट्रॅफिकिंग ॲन्ड रेड लाईट एरिया क्राईम्स या दोन उपक्रमांकरिता स्पेशल ज्युरी अवॉर्ड आणि स्मार्ट पोलीस ऑफिसर अवॉर्ड पुणे शहर पोलिसांना जाहीर करण्यात आले.

# Ahead of festive season, polls, cops hold meeting to aid coordination within depts

## Prepare road map for exchanging information on criminals, strategise operations to monitor cases

Pune Mirror Bureau
punemirror.feedback@gmail.com
TWEETS @ThePuneMirror

Ahead of the upcoming Ganeshotsav and with the state Assembly elections inching closer, police from all the districts of western Maharashtra have come together to tighten the noose on criminals and check antisocial activities in the districts. Police have prepared a road map for exchanging information on criminals, coordinating between control rooms, combining operations. The police heads of various districts came together for an inter-district crime coordination border conference in Pune on Wednesday.



Police heads of various districts held a crime coordination border conference

Talking about the drive, joint commissioner of police Ravindra Shiswe said, "After committing a crime in Pune city and district, miscreants often take shelter in adjoining districts and criminals from outside come to Pune and Pimpri-Chinchwad. But the local police remain ignorant. The meeting was organised to create coordination among them so that there are no untoward incidents during the Gandeshotsav and the impending elections.

Keeping in mind the upcoming festive season, the authorities have given each other confidential information pertaining to gangs operating in their areas to aid easy monitoring of offenders.

With an aim of sharing information regarding investigations and crime control methods, the conference was attended by Suhas Wadke, special inspector general of Kolhapur range; Ravindra Shisve, joint commissioner of Pune police; Sandeep Patil, superintendent of Pune rural police; Ishu Sindhu, superintendent of Ahmednagar police; Manoj Patil, superintendent of Solapur rural police; Bapu Bangar, deputy commissioner of police (DCP) (crime) of Solapur city police, Deepak Sakore, superintendent of government railway police, Pune; Sudhir Hiremath, DCP (crime) of Pimpri-Chinchwad police; Bachchan Singh, DCP (crime) of Pune.

The various police heads have decided to appoint nodal officers for various policing tasks such as crime control, special branch, control room and so on. The officials shared information about cases registered in their jurisdiction and discussed possibility of creating a joint database related to crime in all districts. The issue of violation of experiments by criminals and gang activities was also discussed. The officials are aiming to hold similar conferences every six months.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १२ ऑगस्ट, २०१९

# पोलिसांच्या मुलांसाठी पुण्यात वसतिगृह

## राज्यभरातील कर्मचाऱ्यांच्या मुलांना होणार फायदा; पुणे पोलिसांचा उपक्रम

म. टा. प्रतिनिधी, पुणे

जनतेची सेवा करणाऱ्या पोलिसांना वेळेआभावी त्यांच्या मुलांकडे लक्ष देता येत नाही. त्यामुळे पोलिसांची काही मुले चुकीच्या मार्गाला लागतात. बऱ्याच पोलिसांना आपली मुले शिकून मोठी व्हावी, असे वाटत असले तरी, त्यांना मुलांना शिक्षणासाठी बाहेर पाठविणे परवडत नाही. त्यामुळे राज्यातील पोलिसांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे, या हेतूने पोलिसांच्या मुला-मुलींसाठी पुणे पोलिसांनी शहरात प्रशस्त असे वसतिगृह उभारले आहे. येथे १७० मुला-मुलींची राहण्याची सोय केली जाणार असून, विभागानुसार विद्यार्थ्यांचा कोटा राहणार आहे.

पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्यामुळे या ठिकाणी शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामध्ये पोलिसांच्या मुलांची संख्याही लक्षणीय आहे. पुण्यात शिक्षणासाठी आल्यानंतर मुख्य प्रश्न हा राहण्याचा असतो. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र अशा ग्रामीण भागातून आलेल्या पोलिसांच्या मुलांना हा खर्च परवडत नाही. पोलिसांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, असा पुण्याचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांचा प्रयत्न आहे. यातूनच त्यांनी राज्यातील पोलिसांच्या मुलांसाठी पुण्यात सुसज्ज असे वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला. या वसतिगृहात माफक दरामध्ये पोलिसांच्या मुलांना प्रवेश देण्यात येणार असून, अनेक दर्जेदार सुविधा दिल्या जाणार आहेत. शिवाजीनगर पोलिस मुख्यालयातील इमारतीमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारले आहे. मुलांसाठी ९८, तर मुलींसाठी ७२ जागा आहेत. विशेष शाखेचे उपायुक्त मितेश घट्टे यांनी शहरातील महत्त्वाच्या वसतिगृहांना भेट देऊन त्या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती घेतली. त्यानुसार वसतिगृह उभारले आहे. पुणे पोलिसांकडून यावावत राज्यातील सर्व पोलिस घटकांशी पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार पुणे पोलिसांकडे अर्ज आले असून, प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल.

### वसतिगृह दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| १८०० रुपये | दर महा आकारले जाणारे शुल्क |
| ९८ | मुलांसाठीच्या जागा |
| ७२ | मुलींसाठीच्या जागा |
| १७० | एकूण जागा |




### असा असणार कोटा

| | |
|---|---|
| १५ टक्के | नक्षलग्रस्त भागातील पोलिसांची मुले |
| ३० टक्के | मराठवाडा व विदर्भ |
| ३० टक्के | कोकण व खानदेश |
| २० टक्के | पश्चिम महाराष्ट्र |
| ५ टक्के | पुणे परिसर |

“राज्यभरातून पुण्यामध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या पोलिसांच्या मुलांची संख्या मोठी आहे. 'पोलिस वेलफेअर'मधून शिवाजीनगर पोलिस मुख्यालयात जुन्या इमारतीमध्ये पोलिसांच्या मुलांसाठी वसतिगृह बनविण्यात आले आहे. सध्या आमच्याकडे पावणे दोनशेची क्षमता असून, सहाशे जणांकडून चौकशी झाली आहे. भविष्यात जागा वाढविण्यात येतील.

– डॉ. के. व्यंकटेशम,
पोलिस आयुक्त, पुणे

### विभागवार ठरणार कोटा

पोलिसांच्या मुलांसाठी उभारण्यात येणाऱ्या या वसतिगृहामध्ये विभागानुसार कोटा ठरविण्यात आला आहे. त्यानुसार नक्षलग्रस्त भागातील पोलिसांच्या विद्यार्थ्यांसाठी १५ टक्के, मराठवाडा व विदर्भासाठी ३० टक्के, कोकण व खान्देश ३० टक्के, पश्चिम महाराष्ट्र २० टक्के आणि पुण्यासाठी पाच टक्के कोटा राहणार आहे. त्यातही एखाद्या भागातून कमी विद्यार्थी आल्यानंतर इतर विभागातील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येणार आहे. या ठिकाणी प्राधान्यक्रमानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

### या सुविधा मिळणार

वसतिगृहात एका विद्यार्थ्याला दर महा १८०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना बेडसह एक कॉट, स्टडी टेबल, कपाट व खुर्ची, रिक्रिएशन हॉल, २४ तास वायफाय, वाचनालय, पोलिस रुग्णालय अशा सुविधा दिल्या जाणार आहेत. तसेच, व्यायामशाळा, पोलिस कॅन्टीन, पोलिस मेस या सुविधा माफक दरांमध्ये मिळणार आहेत.

# बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्ही बसविले

प्रभात वृत्तसेवा



**बिबवेवाडी, दि. २९** - बिबवेवाडी पोलीस स्टेशनहद्दीत वाहन तोडफोड, महिला व मुलींचे विनयभंग, चोरी या व अशाप्रकारच्या घटना अप्पर, बिबवेवाडी परिसरात घडू नयेत याकरिता बिबवेवाडी पोलिसांच्या सीसीटीव्हीचे 'प्रोजेक्ट' उपक्रमांतर्गत प्रभाग क्र. ३७ च्या नगरसेविका रुपाली धाडवे यांच्या वार्डस्तरीय निधीतून ३२ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून त्याचे लोकार्पण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

लोकार्पण सोहळ्याचे प्रमुख पाहुणे पुणे शहराचे खासदार गिरीश बापट, पुणे महानगरपालिका सभागृह नेता श्रीनाथ भिमाले, माजी नगरसेवक दिनेश धाडवे, पोलीस सहाय्यक आयुक्त सुनील कलगुटकर, वानवडी विभाग, बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भूषण आडके, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश वाघमारे, बिबवेवाडी पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी व प्रामुख्याने महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बिबवेवाडी पोलिसांनी सीसीटीव्हीचे 'प्रोजेक्ट' उपक्रमांतर्गत बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्याहद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून, ते सर्व एकमेकांशी जीपीएस पद्धतीने जोडले गेले आहेत.

पुढारी – दि. २२ ऑगस्ट, २०१९

# गुन्हेगारी रोखण्यासाठी गुंडांची ‘मास्टर कुंडली’

पुणे : प्रतिनिधी

आगामी कालावधीत साजरा होणारा गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांच्या वतीने सराईत गुन्हेगारांची ‘मास्टर कुंडली’ तयार करण्यात आली. या कुंडलीत अनेक सराईत गुन्हेगार, सतत गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्या, तडीपार गुन्हेगार यांची माहिती असणार आहे.

याच माहितीची एकमेकांमध्ये देवाणघेवाण करत वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुहास वारके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यासाठी अनेक विभागांत या उपक्रमासाठी खास नोडल ऑफिसरचीदेखील नेमणूक करण्यात आली. नुकतीच या विषयाच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी ‘आंतरजिल्हा गुन्हेगारी समन्वय सीमा परिषदे’चे आयोजन पोलिस आयुक्तालयात करण्यात आले होते. पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी उपस्थितांना याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी सहपोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, पोलिस अधीक्षक ग्रामीण संदीप पाटील, अहमदनगर अधीक्षक ईशू सिंधू, सोलापूर ग्रामीण अधीक्षक मनोज पाटील, सोलापूर शहर गुन्हे उपायुक्त बापू बांगर, लोहमार्ग अधीक्षक दीपक साकोरे, सुधीर हिरेमठ, बच्चन सिंह, संभाजी कदम, मितेश घट्टे, अजित टिके उपस्थित होते.

- पोलिसांची मोहीम
- पोलिस करणार माहितीची देवाणघेवाण
- तडीपार गुंडांवर राहणार नजर
- समन्वयातून गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी विविध उपक्रम

## आंतरजिल्हा व्हॉट्सॲप ग्रुप

शहरातील गुन्ह्यांची माहिती इतर जिल्ह्यांतील पोलिसांना पाठविण्यासाठी व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आला आहे. चेनस्नॅचिंग, वाहनचोरी, घरफोड्या करणाऱ्या सराइतांची माहिती एकमेकांना पुरविल्यास, गुन्ह्यांना प्रतिबंध होण्यास मदत होणार आहे. या वेळी झालेल्या बैठकीला उपस्थित असलेल्या प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या हद्दीत घडणाऱ्या विविध गुन्ह्यांची माहिती इतरांना दिली.



पत्रकार परिषदेत माहिती देताना पोलिस अधिकारी.

## तडीपार गुंडांवर राहणार करडी नजर

अनेकदा एका जिल्ह्यातून तडीपार केल्यानंतर सराईत गुन्हेगार शेजारच्या जिल्ह्यात वास्तव्य करतात. त्यातूनच ते गुन्हेगारी कारवाया करत असतात. त्यामुळे त्यांच्यावर करडी नजर ठेवण्यासाठी या बैठकीत विशेष उपायोजनांवर चर्चा करण्यात आली. प्रत्येक विभागात तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांची माहिती संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्या जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेला गुन्हेगार, कोणत्या ठिकाणी वास्तव्यास आहे. तो त्या ठिकाणी काय करतो, याची संपूर्ण माहिती पोलिसांजवळ असणार आहे. त्यामुळे तडीपार गुन्हेगारावर वचक निर्माण होण्यास मदत होणार आहे.

## गुंडाच्या मिरवणुकी व धांगडधिंग्यावर कडक कारवाई

अनेकदा कारागृहातून सुटल्यानंतर सराईत गुंडांच्या समर्थकांकडून कारागृहापासून शहरातील काही प्रमुख मार्गांवर मिरवणुका काढण्यात येतात. यामध्ये अनेक सराईत गुन्हेगार सहभागी होतात. असे अनेक प्रकार शहरात घडलेले आहेत. त्यामुळे याचीदेखील आयुक्त व्यंकटेशम यांनी गंभीर दखल घेतलेली असून, यासाठी खास उपायोजना करत कडक कारवाई करण्यात येणार आहे. जेव्हा एखाद्या जिल्ह्यातील गुंड कारागृहातून बाहेर येणार आहे, तेव्हा त्याची माहिती त्या जिल्ह्यातील पोलिसांना देण्यात येणार आहे. त्यांचे पथक व स्थानिक शहर पोलिसांचे पथक तेव्हा कारागृह परिसरात तैनात असणार असल्याची माहिती डॉ. रवींद्र शिसवे यांनी दिली.

## वाळूमाफिया आणि गुंडांवर संयुक्त कारवाई

शहर पोलिस, ग्रामीण पोलिस व नगर पोलिसांच्या वतीने नगर-दौंड वाळूमाफिया व गुन्हेगारांवर आगामी कालावधीत संयुक्त कारवाई करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. तिन्ही जिल्ह्यांतील पोलिसांची ही संयुक्त मोहीम असणार आहे.

**Pune Mirror** - 12 August, 2019

# City cops to pen down essays on police dept

## Idea behind the writing contest is to instil sense of pride among the forces, provide them a creative outlet


Gunwanti.Paraste
@timesgroup.com

TWEETS @gunwantimirror


The city police department is known to come up with corrective measures from time to time to bring in reforms within the force. In a similar initiative, Pune police commissioner K Venkatesham has urged each member of the police force to pen down their experiences as individuals in the department and express their views on how they feel about their work and the department. The unique programme takes into cognisance the fact that these law enforcement professionals also have a tender, creative side to them. Apart from discharging their daily duties, while some officials have a writing streak, taking to either prose or poetry, some among them are melodious crooners. However, due to lack of time and right platforms, most of them fail to showcase their creative talents before the masses. This prompted Venkatesham to come up with this creative writing talent hunt initiative.



REPRESENTATIONAL IMAGE

Once all the entries are in, five best submissions will be selected

Of all the submissions, five best creative writers will be picked up by the department based on how well the officials write about their stint in the police force. Instructions in this regard have been given to deputy commissioners of police (DCPs) and crime DCPs of each zone to percolate the news to all the police personnel in their jurisdiction and encourage them to participate in the essay-writing competition. All 30 police stations and crime branches under the jurisdiction of the city police, from the ranks of a constable to assistant commissioner of police, have been encouraged to take part in the drive.

The idea behind the project is also to instil a sense of pride among the police forces about the thankless work they do each they besides providing a channel to the creative side of these officials, said Venkatesham. Although the last date of submission for the entries was August 10, deadlines have been relaxed for those policemen and women who missed out on it for being caught up in office work.

Visibly kicked about the initiative, police officials have welcomed the move, with some saying that they are eager to write about how their work has touched the general public, who, in turn, have wished these cops well.

Talking about the initiative, Sambhaji Kadam, DCP (EOW), told *Mirror*, "It is the responsibility of DCPs of each zone to collect the essay submissions from participants from their jurisdictions. Once we select the five best entries, we'll frame those copies."

Elaborating further on the project, additional police commissioner (crime) Ashok Morale told *Mirror*, "After receiving all the entries, we will form a committee comprising educationists to vet the five best essays."

**Sakal Times** - 11 August, 2019

# 'We follow up with PMC on pothole repairing'

## Commissioner of Police **Dr K Venkatesham** speaks with Mubarak Ansari about the city's traffic problems during the rainy season.




Mubarak Ansari
@VictrForceGhazi






**Every year, the Pune police traffic branch submits a list of the chronic waterlogged spots to the Pune Municipal Corporation (PMC), which is supposed to carry out repairs. Does the police follow it up with the PMC?**

We have already provided the list of 35 chronic waterlogged points and 67 pothole spots in the city to the Pune Municipal Corporation (PMC). We constantly follow it up with them asking them to repair potholes and waterlogged points.

**What are the reasons for traffic jams and congestions?**

Waterlogging and potholes reduce the lane width resulting in the reduction of the carriageway. Huge number of four-wheelers ply on roads during rains. Traffic moves slowly due to slippery roads. We faced congestions last week due to an unprecedented deluge, which resulted in the closure of the Bhide Bridge and the Tilak Bridge, which were critical for the movement of two-wheelers.

**What steps are being taken by the traffic branch of Pune police to improve the situation?**

The presence of the traffic police and clearing of traffic during the peak hours by shutting the signals are two measures. We got the potholes filled and the drainage lines were fixed. Damaged drainage lines was a major reason for congestions at Nal Stop on Karve Road. We have taken help of Pune Metro, PMC and Cantonment Boards to fill potholes. Also, a drive is being undertaken against no parking and double parking to ease congestion.

**पुण्यनगरी – दि. १४ ऑगस्ट, २०१९**

# हडपसरमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी



**हडपसर : हांडेवाडी रोड येथे मुस्लीम बांधवांनी सामूहिक नमाज पठण केले. यावेळी भाजप सरचिटणीस संजय सातव, असलम शेख यांनी शुभेच्छा दिल्या.**

**हडपसर :** हडपसरमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. हांडेवाडीरोड येथील श्रीराम चौकात नमाज पठण करीत एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या. भाजप ओबीसी सेल हडपसर विधानसभा सरचिटणीस संजय सातव यांनी मुस्लीम बांधवांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी असलम शेख, संदीप नलावडे, सोहेल जमादार, बशीर शेख, फैयाज शेख, समीर सय्यद, सोमनाथ सूर्यवंशी, आकाश राजपूरे आदी उपस्थित होते. सामूहिक नमाज पठण कार्यक्रमाप्रसंगी सहायक पोलीस आयुक्त सुनील फुलारे, वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, सहायक पोलीस निरीक्षक वरपडे यांनी नागरिकांना शांततेचे आवाहन केले. हांडेवाडी रोड येथील रस्त्यावर वाहतूक सुरळीत करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय सातव यांच्यासह कार्यकर्त्यांनी मदत केली.

**Sakal Times - 11 August, 2019**

# 73 persons get back stolen valuables worth ₹1.18 crore

**ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com

**PUNE**
Stolen valuables worth Rs 1.18 crore were returned to 73 persons at a programme on Saturday at the Police Commissioner's Office in Camp. About 300 persons including senior police officers were present on the occasion.

The returned valuables included gold, silver ornaments, cash, vehicle, etc. Additional Commissioner of Police (Crime) Ashok Morale said, "These steps will assist in preventing burglaries and other crimes. We have intensified patrolling as well as checking of criminals on record." Most of the cases in which valuables were returned were from Zone 4 (24) cases and Zone 1 (18 cases). Among the police stations, most cases (9) were from Samarth police station.



**GOOD GESTURE:** Additional Commissioner of Police (crime) Ashok Morale (L) greeting a woman who got back her stolen valuables on Saturday.

पुण्य नगरी – दि. १५ ऑगस्ट, २०१९

# अत्याधुनिक स्पॉटर किटद्वारे गुन्हेगारांवर 'नजर'

## संवेदनशील ठिकाणी टेहळणी व गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी उपयुक्त

**पुणे : प्रतिनिधी**

शहरातील संवेदनशील ठिकाणी टेहळणी, तसेच गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता असलेले स्पॉटर किट विकसित करण्यात आले आहे. आयुक्तालयातील मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी जोडलेले हे स्पॉटर किट कोठेही सहजतेने हाताळता येऊ शकते. महत्त्वाच्या व्यक्ती व ठिकाणच्या सुरक्षिततेसाठी हे किट घटनास्थळी घेऊन जात पोलीस कर्मचारी, तसेच बीट मार्शल त्याचा वापर करू शकतात.



राज्याची शैक्षणिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक राजधानी असलेले पुणे शहर भारतातील वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. शहरात लष्कराचे सदर्न कमांड आणि वेस्टर्न एअर फोर्स कमांड यांची कार्यालये आहेत. त्यामुळे शहरात महत्त्वाच्या व्यक्तींची ये-जा असते. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षाव्यवस्था आणि टेहळणी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामध्ये आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशिअल इंटेलिजन्सवर आधारित असणारे स्पॉटर किट (सर्व्हिलन्स ऑफ पोटेन्शिअल ऑफिडर थ्रू टेक्नॉलॉजी) याचीही भर पडली आहे.

पुणे शहर पोलिसांनी मणिपाल ग्रुप एंटिटिज, मणिपाल टेक्नॉलॉजीज लिमिटेड आणि विज्ञा लॅब्सच्या सहकार्याने स्पॉटर किट विकसित केले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर प्रत्यक्ष टेहळणी, गुन्हेगारांचा माग काढणे, संशयिताचा आणि ज्याचा पाठलाग करायचा आहे अशा व्यक्तींचा माग ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो. यामध्ये हार्डवेअर आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्सवर आधारित फेस रेकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. स्पॉटर कंट्रोल किट हे सेंट्रल कंट्रोल रूम आणि मोबाइल ॲपशी जोडलेले आहे. पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, विशेष शाखेचे उपायुक्त मितेश घट्टे, गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंग यांच्या मार्गदर्शनातून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

### स्पॉटर किटमध्ये या तंत्रज्ञानाचा समावेश

- **डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर्स** : डीएफएमडीवर आधारित स्पॉटर किटमुळे इंटिग्रेटेड कॅमेरे, एआय हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि प्लग ॲण्ड प्लेमधील सावध करणाऱ्या यंत्रणेच्या माध्यमातून ज्याचा पाठलाग करायचा आहे अशा व्यक्तीला हेरण्यास मदत होते. गुन्हेगार आणि संशयितांना प्रत्यक्ष संघटना स्थळावर हेरण्यासाठी संवेदनशील सार्वजनिक स्थळावर तैनात करण्यात येईल.
- **सर्वेलन्स व्हेइकल बेस्ड कमांड सेंटर्स** : यामध्ये ३६०अंशांचा व्ह्यू असणारा कॅमेरा आहे, ज्यात झूम इन आणि झूम आउटची सुविधा आहे. यामुळे गुन्हेगारांना प्रत्यक्ष घटनास्थळावर हेरण्यासाठी मोबाइल कमांड सेंटर कोठेही व कधीही तैनात केले जाऊ शकते. तसेच यामध्ये सावध करणाऱ्या यंत्रणा आहेत, ज्या गुन्हेगारांचा आणि संशयितांचा माग ठेवू शकतात.
- **मोबाईल क्लाउड टेक्नॉलॉजी** : हे यंत्र पोलीस मोबाइलसारखे सहज हातात घेऊन फिरू शकतात. पोलीस आणि बीट मार्शल्स हे गुन्हेगारांच्या डेटाबेसमधील माहितीबरोबर संशयितांचे छायाचित्र प्रत्यक्ष घटनास्थळावर पडताळून पाहू शकतात, तसेच माहिती जुळल्यास त्यावर तातडीने कारवाई करतील.

# राज्यातील पोलिसांच्या दिमतीला ‘थर्ड आय’

## वायरलेस विभागाकडून काम सुरू; एका क्लिकवर गुन्हेगारांसह सर्व माहिती

**पुणे, ता. १० :** गुन्हेगारांचे स्वरूप बदलत असताना पोलिसही स्वतःला स्मार्ट बनवत आहेत. गुन्हेगारांबद्दल खडा न् खडा माहिती ठेवण्यासह नवीन घडणारे गुन्हे, आरोपींचा इतिहास, न्यायालयात सुरू असणारे खटले एका क्लिकवर बघण्याची सुविधा पुणे पोलिस दलात 'थर्ड आय' या ॲपद्वारे केली आहे. त्यामुळे पोलिसांचे काम सुकर होत असल्याने राज्याच्या पोलिस दलासाठी अशाच प्रकारचे ॲप विकसित केले जाणार आहे. त्यासाठी पुणे पोलिसांनी वायरलेस विभागाला सर्व माहिती पुरविली आहे.

पुण्यासह राज्यातील सर्व पोलिसठाण्यांमध्ये 'सीसीटीएनएस' या प्रणालीद्वारेच गुन्हे दाखल केले जात आहेत. हे काम ऑनलाइन असले तरी प्रत्येक पोलिसाला याबद्दल माहिती नसते. गुन्हेगारांची, आरोपींची माहिती लेखी स्वरूपात आहे, न्यायालयात कोणते खटले सुरू आहेत? कोणता गुन्हेगार जामिनावर बाहेर सुटणार आहे? कोणाची शिक्षा पूर्ण झाली आहे? घडणारे गुन्हे, गुन्हे करणाऱ्यांचा वयोगट, स्थळ यासह अनेक माहिती पोलिसांकडे असते. याचे विश्लेषण मोजकेच पोलिस करत असतात. अनेकांना त्यांच्या हद्दीच्या बाहेर काय घडले आहे, हे माहिती नसते.

गुन्हेगारी कमी करण्यासाठी या माहितीचे विश्लेषण करून, त्याचा काम करताना उपयोग करता आला पाहिजे, यासाठी पुण्याचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी एका खासगी कंपनीकडून 'थर्ड आय' हे ॲप विकसित करून घेतले. गेल्या काही महिन्यांपासून याचा शहरामध्ये वापर केला जात आहे. या ॲपची राज्यातील पोलिसांनाही मदत होऊ शकते. त्यासाठी या ॲपचे तंत्रज्ञान वायरलेस विभागाला देऊन संपूर्ण राज्यासाठी एक ॲप तयार केले जाणार आहे. याबाबत वायरलेस विभागाच्या अधिकाऱ्यांनीही अशा प्रकारचे ॲप तयार करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, असे सांगितले.

पुणे पोलीस

THIRD I

INFORM.INNOVATE.IMPACT

**ॲपची वैशिष्ट्ये**

- प्रत्येक पोलिसाला स्वतःचे युजरनेम व पासवर्ड
- गुन्ह्यांचे विश्लेषण आपोआप होणार
- गुन्हे कोणत्या वेळेत जास्त घडतात, याची माहिती
- गुन्हेगारांचा वयोगट कळणार
- तडीपार, बेपत्ता, न्यायालयीन तारखा कळणार

**पुणे पोलिसांनी तयार केलेल्या 'थर्ड आय' ॲपमुळे अनेक कामे सोपी होणार आहेत. ऑनलाइन सर्व माहिती पोलिसांना मिळत आहे. हे मॉडेल राज्यात राबविण्यासाठी शहरात ही माहिती वायरलेस विभागाला दिली आहे.**

**– डॉ. के. व्यंकटेशम,** पोलिस आयुक्त, पुणे



# For Ganesh mandals, Pune Police issues rules about sound systems and dhol tasha troupes

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, AUGUST 22

THE PUNE city police on Thursday announced a set of rules about the sound systems and *dhol tasha* troupes used in Ganesh festival, which is 10 days away. The many Ganesh mandals in the city have to adhere to these rules.

On Thursday, Joint Commissioner of Police (Law and Order) Ravindra Shisve issued two separate orders — one for the dhol tasha troupes and the other for entities which rent or use speaker systems during Ganesh festival. These orders will be in force from 6 am on September 2, the first day of the festival, till 10 pm on September 13, the day after the *visarjan* (immersion).

## THE ZONES AND THE LIMITS

| Zone | Day-time limit | Night-time limit |
|---|---|---|
| Industrial Zone | 75 | 70 |
| Commercial Zone | 65 | 55 |
| Residential Zone | 55 | 45 |
| Silent Zone | 50 | 40 |

*in decibels*

Police have specified the maximum number of members in a *dhol tasha* troupe and said no more than 40 *dhols*, 10 *tashas* and six *zanj*, a smaller version of clash cymbals, will be allowed in each troupe. The use of high-decibel bells, along with *dhol tashas*, has been banned. The number of groups per Ganesh mandal has been limited to two but in the case of Manache Ganpatis — the five traditional mandals which lead the procession — three groups per mandal have been allowed.

The order further stated, "Separate permissions to be taken by the *dhol tasha* teams for participation in Ganesh installation and immersion processions from the same local police authority. No group will be allowed to go against the direction of the main procession. The groups will be allowed to perform on the route and road junction stipulated in the permission granted to them."

The order categorically stated that DJ dolby systems will not be allowed in the processions. The mandal will also have to take separate permission for the use of sound systems. The operator of the system, who will have to submit all his details to the police, will be issued an identity card.

These orders are issued every year by the police, in accordance with a 2010 Bombay High Court order and rules under the Environment Protection Act, 1986. In the past, police have filed offences against Ganesh mandals that have flouted the rules announced prior to the festival every year.

PuneMirror - 12 August, 2019

STUDY CONDUCTED ACROSS 30 POLICE STATIONS

# 'Over 20 pc of molestation victims in Pune are minor girls'

## Team from SNDT College analyses 457 cases filed over 11 months

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, AUGUST 9

MORE THAN 50 per cent of "sheer molestation" cases reported in Pune over an 11-month period happened in public places, and almost one out of five such cases occurred at the workplace, reveals a study conducted in the city.

Conducted by a team from the SNDT Arts and Commerce College for Women, the study also revealed the alarming number of cases in which the victims were minor girls. The team analysed 457 cases of molestation registered with 30 police stations in the jurisdiction of Pune City Police between January 2018 and November 2018.

"Sheer molestation" cases are those in which no previous dispute or enmity is involved, said the study team.

A report on the study's findings was submitted to the office of Police Commissioner K Venkatesham, and shared with mediapersons on Friday in the presence of Additional Commissioner of Police (crime) Ashok Morale and Deputy Commissioner of Police (crime) Bachchan Singh.

Of the 457 cases analysed, minor girls were the victims in 99 cases. "The cases were divided into four categories: those involving previous dispute, cases involving enticement/inducement, cases involving morbidity (unnatural acts) and cases involving misuse of Internet and technology," said Dr Madhavi Kulkarni, who was part of the study team.



The team from SNDT College presents its findings at the Pune police commissionerate on Friday. *Ashish Kale*

While 112 cases were lodged under Section 354 (assault or criminal force to woman with intent to outrage her modesty), in some cases, other sections of Indian Penal Code pertaining to crimes like torture and threats were also invoked.

"...We found 48 cases of sheer molestation, in which there was no previous dispute or any inducement. The analysis revealed that the number of these cases was higher in the jurisdiction of five police stations. One woman police officer from each of these five police stations was selected for the focus group discussion conducted for qualitative analysis of these cases," said Vasanti Joshi, another member of the team.

In seven of these 48 cases, a minor girl was the victim. Of these cases, 26 happened in public places, nine in workplaces and 13 in private places. The victim was familiar with the accused in 21 of the 48 cases.

The report recommended the need to create awareness about Section 354 among women from all sections of society, the need to strengthen the implementation of the section without delays, giving priority to security and safety of women at public places and educating higher secondary students about interpersonal relationships.

ACP Morale said the recommendations would be considered and steps will be taken accordingly for the safety and security of women.

The study team comprised Vice-Principal of SNDT College Dr Madhavi Kulkarni, Head of Department (HoD) of Economics, Dr Madhura Joshi, HoD, Psychology Manasee Rajhans, and HoD, Commerce, Vasanti Joshi.

### MOLESTATION CASES IN PUNE

| | |
|---|---|
| 457 Total cases analysed | 11 months Span of study |
| 99 cases Victims are minor girls | 30 Police stations |
| In public places | 50 pc cases |
| At workplaces | 20 pc cases |

### EXPLAINED

## 'More cases reported, but not due to MeToo'

THE STUDY stated that the increase in the number of molestation cases reported was not directly related to the 'MeToo' movement. "The major reasons behind the increase in reported molestation cases in the age group of 12 to 25 years are previous relationships, romantic advances being thwarted, and infatuation... A few cases of misuse of section 354 of IPC also take place, which have serious consequences," it stated.

**Sakal Times - 15 August, 2019**

# Pune police will now SPOTT crooks faster

According to police officials, the Door Frame Metal Detectors-based SPOTTer Kit enables real-time SPOTTing of persons-of-interest through integrated cameras, Al hardware, Software and alerting system embedded in a plug-and-play carry-on case that can be deployed anywhere at any time. These DFMDs will be deployed in vulnerable public and sensitive locations for weeding out criminals and suspects in real time.

Deputy Commissioner of Police (Crime) Bachchan Singh said that "Surveillance vehicle based SPOTTer kits have 360 degree view cameras with zoom-in and zoom-out capabilities that enable the deployment of mobile command centres that can be deployed anywhere-anytime for criminal and suspect tracking. The surveillance vehicle based command centres have in-built real-time Al-based hardware, software and alerting systems that can track criminal and suspect movement."

Deputy Commissioner of Police (special branch) Mitesh Ghatte added, "Mobile App based SPOTTer technology has been built to enable on-the-ground policemen and beat marshals to upload a picture of suspect in real time to match against the criminal database, using handheld devices. Immediate action can be taken when a match is found. This technology is extremely handy, as information is available to all the security personnel at their fingertips."

The SPOTTer Kits are also connected to the central control room and mobile apps to build redundancy for surveillance alerts and real-time action.

These SPOTTer kits have been developed and deployed by the Pune police in coordination with The Manipal Group entities, Manipal Technologies Limited and Vijria Labs.

The key officers who were instrumental in enabling the SPOTTer Kits are Deputy Commissioner of Police Bachchan Singh, Mitesh Ghatte, Inspector Pasalkar of special branch and Inspector Ghodekar of Wireless Division.

## CITIZENS' PRIVACY NOT VIOLATED

Commissioner of Police Dr K Venkatesham said, "The SPOTTer kits will help in for real-time surveillance and tracking of criminal, suspect and person-of-interest. This technology is used only for criminal, suspect and person-of-interest tracking without intruding into privacy of ordinary citizens. Pune police will continue to innovate and make use of emerging technologies for making a safe city and secure nation."

**The Indian EXPRESS - 14 August, 2019**

# Pune police to use hi-tech kits to help track criminals

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, AUGUST 14

THE PUNE City Police on Wednesday introduced "SPOTTer" (Surveillance of Potential Offender Through Technology) kits to help its personnel track criminals, suspects and persons of interest.

The kits were developed and deployed by the Pune City Police in coordination with Manipal Technologies Limited and Vijna Labs. It was introduced during a programme at the Pune Police Commisionerate in the presence of senior officers such as Commissioner K Venkatesham, Joint Commissioner of Police Ravindra Shisve and Superintendent of Pune Rural Police Sandip Patil.

"While manpower is limited, using technology increases efficiency and performance. The technology based on modern artificial intelligence will help in tracking the criminals," said Venkatesham.

The kit is embedded with technologies such as facial recognition, door frame metal detectors (DFMD), surveillance vehicle-based command centres and cloud technology.

"The DFMD in SPOTTer Kit enables real-time spotting of persons of interest through integrated cameras, hardware, software and alerting system embedded in a plug and play carry on case that can be deployed anywhere at any time. These DFMDs will be deployed in vulnerable public and sensitive locations for weeding out criminals and suspects," read a police press release.

It further stated, "Surveillance vehicles in the kits have 360-degree view cameras with zoom-in and zoom-out capabilities that enable the mobile command centres which can be deployed for criminal and suspect tracking... Mobile cloud has been built to enable policemen and beat marshals to upload a picture of the suspect to match against the criminal database, using hand-held devices. Immediate action can be taken when a match is found. This technology is handy as the information is available to all security personnel at their finger tops."

**The kit has tools such as facial recognition and door frame metal detectors**

# अभिप्राय...

मा० वरिष्ठ पो. निरीक्षक सो,
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाडवी पोउपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलीस व जनता संवादातील संबंध अधिक सुधारण्यास मदत होत आहे. जनतेचा व सामान्य लोकांचा पोलीसांवरचा विश्वास अधिक बळकट होत आहे. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम यशस्वी असून तो पोलीसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शन असा ठरला आहे.

मा. सादर असे
दि. 18/05/19.
(सही)
पोउपनिरीक्षक
कोंढवा पो.स्टे. पुणे शहर

---

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५९९१

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

माननिय महोदय,
दर्पण पुस्तिकांचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या पो. स्टेला दाखल गुन्हे, त्यांची थोडक्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दखल या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संबंधित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरिताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

दिनांक :- २९.०५.२०१९

(सही) Mahadik LPN 5991.
स्वाक्षरी


Man arrested for estranged girlfriend's murder attempt
private security firms warns police chief
बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण
बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारु
चालक व मालकांवर कारवाई करणार
अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई
पाच जणांच्या टोळीला अटक
पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत
शाखेकडून गुंडांची झाडाझडती
वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक
धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद
कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर
चार किलो गांजासह आरोपीला अटक
पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास
महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक
पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान
कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष
गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक
पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे
पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'
नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक
सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात
Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore
उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच
Gang duping people with promise of real American dollars nabbed
नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार
अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास
दामिनींनी केले पाकीट परत
सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत
भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ
विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी
राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम
आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव
गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे
इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद